# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १९/०७/२०१६**

**सायं ४.३० वा.**

| अनु. क्र. | विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मा. सर्वसाधारण सभा दि. १८/०६/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मा. सर्वसाधारण सभा दि. १८/०६/२०१६ रोजीचे इतिवृत्तात विषय क्र. ६ च्या ठरावात दुरुस्ती करुन इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक - वृंदेश पाटील<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| २ | प्रश्नोत्तरे | **ठराव :-** निरंक |
| ३ | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव | १ महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, नवि २३ (शासन निर्णय)<br>२ महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, नवि ४ |
| ४ | वसई -विरार महानगरपालिका आस्थापनेवरील मयत सफाई कामगाराच्या वारसास वारसा हक्क पध्दतीने महानगरपालिका सेवेत सामावून घेणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** वरील शासन परिपत्रक व आस्थापनेवरील रिक्त पदाचा विचार करता कै. भालचंद्र निळके, मयत सफाई कामगाराच्या वारसास श्री. विजय भालचंद्र निळके हयांना वसई-विरार शहर महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावून घेणेस आजची ही महासभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक - सुदेश चौधरी<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ५ | श्री. मयुर मंगेश जाधव यांना लाड समिती शिफारशीनुसार महानगरपालिका सेवेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबत. | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील सफाई कर्मचारी कै. मंगेश राजाराम जाधव यांचे सेवेत असताना दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी निधन झाले आहे. त्यांचा मुलगा श्री. मयुर मंगेश जाधव (वय २० वर्षे) हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक - कांता पाटील<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |

| | | |
|---|---|---|
| ६ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय वसई आस्थापनेवरील कर्मचारी श्रीमती सविता वसंत चव्हाण, सफाई कामगार यांना स्वेच्छानिवृत्ती देणेबाबत. | **निर्णय/ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती सविता वसंत चव्हाण यांनी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्ती मिळणेबाबत विनंती केली आहे. श्रीमती सविता चव्हाण यांची २० वर्षाची अर्हताकारी सेवा पूर्ण झाली असल्याने व तसेच त्यांचेविरुध्द कोणतीही प्रशासकिय शिस्तभंगविषयक कारवाई सुरु व प्रलंबित नाही. सबब महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ६६(१) नुसार त्यांची स्वेच्छानिवृत्तीची नोटीस स्विकारुन नोटीसीस तीन महिने पुर्ण झालेनंतर दिनांक ०२/०८/२०१६ रोजी मध्यान्होत्तर त्यांना महानगरपालिका सेवेतुन स्वेच्छानिवृत्त करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच श्रीमती सविता चव्हाण यांना स्वेच्छानिवृत्तीनंतरचे देय असलेले अनुषंगिक लाभ अदा करणेस ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक - नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ७ | श्रीमती भावना प्रदीप वाघ यांना लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने महानगरपालिका सेवेत सफाई कामगार पदावर समावून घेणेबाबत. | **निर्णय/ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील सफाई कर्मचारी कै. रुक्मिणी सोन्या कोकिरा यांचे सेवेत असताना दिनांक ३० डिसेंबर, २०१४ रोजी निधन झाले आहे. त्यांचे निधनानंतर त्यांचे पश्च्यात वारस पती श्री. सोन्या जीव्या कोकिस हे एकमेव वारस आहेत. तथापि त्यांना आजाराने व वयोमानाने त्यांना काम करणे शक्य नसल्याने त्यांची भाची सून सौ. भावना प्रदिप वाघ यांना वारस म्हणून नामनिर्देशित करुन त्यांचे पत्नीचे जागी महानगरपालिकेत सफाई कामगार या पदावर सामावून घेणेबाबत प्रतिज्ञापत्र सादर केले आहे.<br>सौ. भावना प्रदिप वाघ (वय ३१ वर्षे) या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक - नितीन राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० (५) अन्वये मा.स्थायी समितीवरील रिक्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी नव्याने नेमणूका करणेबाबत. | **ठराव :-** स्थायी समिती सभा दिनांक १४/०७/२०१६ ठराव क्र. ८६ अन्वये, स्थायी समितीवरील खालील आठ सदस्य निवृत्त झालेले आहेत. १) लॉरेल डायगो डायस २) मिलिंद जगन्नाथ घरत ३) प्रकाश दुमा रॉड्रीक्स ४) अब्दुल हक सुलेमान पटेल ५) उमेश दत्तात्रेय नाईक ६) मनिषा मनोहर जाधव ७) धनंजय विठ्ठल गावडे ८) कांता अनंत पाटील<br>सदर निवृत्त झालेल्या स्थायी समिती सदस्य पदाच्या जागेवर बहुजन विकास आघाडी या गटाकडुन १) उमेश दत्तात्रेय नाईक २) राजेंद्र राजाराम कांबळी ३) अजित यशवंत नाईक ४) पंकज पद्माकर पाटील ५) अफिफ जमिल शेख ६) वृंदेश (उमा) पाटील ७) सुदेश प्रभाकर चौधरी यांच्या नावाची नामनिर्देशिनाद्धारे स्थायी समितीवर नियुक्ती करणेकामी शिफारस केलेली आहे.. तसेच शिवसेना या गटाकडून १) स्वप्निल अविनाश बांदेकर यांच्या नावाची नामनिर्देशिनाद्धारे स्थायी समितीवर नियुक्ती करणेकामी शिफारस केली आहे त्यानुसार स्थायी समिती वरील ८ रिक्त जागांवर उपरोक्त आठही |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>सदस्यांची स्थायी समितीचे सदस्य म्हणून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येत असून सोळा सदस्यीय स्थायी समिती खालीलप्रमाणे असेल.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्यांचे नाव</th><th></th><th>अ.क्र.</th><th>सदस्यांचे नाव</th></tr>
<tr><td>१.</td><td>नितिन दिनानाथ राऊत</td><td></td><td>९.</td><td>चंद्रकांत यशवंत गोरिवले</td></tr>
<tr><td>२.</td><td>उमेश दत्तात्रेय नाईक</td><td></td><td>१०.</td><td>सुनिल मोरेश्वर आचोळकर</td></tr>
<tr><td>३.</td><td>पंकज भास्कर ठाकूर</td><td></td><td>११.</td><td>अजित यशवंत नाईक</td></tr>
<tr><td>४.</td><td>छाया धर्मदत्त पाटील</td><td></td><td>१२.</td><td>समिर जिकर डबरे</td></tr>
<tr><td>५.</td><td>प्रशांत दत्तात्रेय राऊत</td><td></td><td>१३.</td><td>किशोर गजानन पाटील</td></tr>
<tr><td>६.</td><td>सुदेश प्रभाकर चौधरी</td><td></td><td>१४.</td><td>राजेंद्र राजाराम कांबळी</td></tr>
<tr><td>७.</td><td>वृंदेश रघुनाथ पाटील</td><td></td><td>१५.</td><td>अफीफ जमिल शेख</td></tr>
<tr><td>८.</td><td>पंकज पद्माकर पाटील</td><td></td><td>१६.</td><td>स्वप्निल अविनाश बांदेकर</td></tr>
</table>
अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक - पंजक ठाकूर<br>
ठराव सर्वानुमते मंजुर</td>
</tr>
<tr>
<td>९</td>
<td>कु.अमोघ विवेक कुरकुरे ,जलतरणपटू यास अनूदान देणे</td>
<td>निर्णय / ठराव :- प्रशासनाकडुन सदर प्रकरणी गोषवारा / प्रस्ताव प्राप्त न झाल्याने सदर विषय स्थगित ठेवावा असे आजची सभा ठरवित आहे.<br>
अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक - पंजक चोरघे<br>
ठराव सर्वानुमते मंजुर</td>
</tr>
<tr>
<td>१०</td>
<td>तत्कालीन नालासोपारा व नवघर-माणिकपूर या नगरपरिषदांकडे वर्ग झ्ालेल्या पेल्हार धरण योजनेवरील रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या सेवेबाबत निर्णय घेणे.</td>
<td><u>ठराव/निर्णय</u> :- प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव व त्याअनुषंगाने मा. आयुक्तांनी केलेला सविस्तर खुलासा विचारात घेता, २५६ ई-फॉर्म अन्वये कार्यव्ययी आस्थापनेवरील वर्ग-३ च्या पंपचालक/गाळणीचालक इ. ५ कर्मचाऱ्यांना व रोजंदारी तत्वावरील २१ अशा एकूण २६ कर्मचाऱ्यांबाबत संचालक, नगर परिषद प्रशासन यांचे दि. २२ ऑगस्ट, २००६ च्या आदेशातील निर्देशानुसार कार्यवाही करावी. मयत कर्मचाऱ्यांचे कायदेशीर वारसांना तसेच सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना पेमेंट ऑफ ग्रॅच्युइटी ॲक्ट नुसार उपदानाची रक्कम त्वरीत अदा करावी. तसेच उर्वरित जे कर्मचारी आहेत, त्यांना किमान वेतन कायदा नुसार वेतन देऊन त्यांच्या सेवेची आवश्यकता विचारात घेऊन त्यांची सेवा खंडित न करता पुढे चालू ठेवावी, असा निर्णय ही महासभा घेत आहे.<br>
अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक - अब्दुल हक सुलेमान पटेल<br>
ठराव सर्वानुमते मंजुर</td>
</tr>
<tr>
<td>११</td>
<td>वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात</td>
<td><u>प्रस्तावाचा निर्णय :-</u> वरील प्रस्तावाचा विचार करता वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात शौचालयावर कॉम्प्यक्ट</td>
</tr>
</table>

<table>
<tr>
<td></td>
<td>शौचालय/उद्यानात कॉम्प्यॅक्ट मोबाईल टॉवर उभारुन त्या मोबदल्यात भाडे, सी.सी.टी.व्ही. यंत्रणा, शौचालय पुर्न:बांधणी, शौचालयाची टॉवर देखभाल दुरुस्ती व जाहिरातीचे हक्क वैगेरे अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत मोबाईल कंपन्यांकडून स्वारस्याची अभिरुची (EOI) मागविण्याबाबत.</td>
<td>मोबाईल टॉवर उभारुन त्या मोबदल्यात भाडे सी.सी.टी.व्ही. यंत्रणा शौचालय पुर्न:बांधणी शौचालयासाठी देखभाल दुरुस्ती वैगेरे अन्य सुविधा उपलब्ध करुन घेणेसाठी इच्छुक मोबाईल कंपन्यांकडून E.O.I (स्वारस्य अभिरुची) मागविणेसाठी जाहीर प्रसिध्दी देणेस हि सभा मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक - संजय पिंगुळकर<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td>
</tr>
<tr>
<td>१२</td>
<td>वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेत मा. सदस्य सचिव प्रादेशिक परिवहन प्राधिकरण मुंबई महानगर क्षेत्र तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे विभाग ठाणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या मंजूर प्रवासी भाडे दरवाढीची अंमलबजावणी करणेबाबत.</td>
<td><u>ठराव / निर्णय :-</u> सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन केले असता २.०० कि.मी पासून ते १२.०० किमीपर्यंत अतंरामध्ये मा. सदस्य सचिव प्रादेशिक परिवहन प्राधिकरण मुंबई महानगरक्षेत्र तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे विभाग ठाणे यांनी जरी वसई विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेच्या दरवाढीस मंजुरी दिलेली आहे. तथापि, सरसकट दरवाढ न करता टप्प्याटप्प्याने दरवाढ देण्यात यावी. जेणेकरुन नागरिकांवर अतिरिक्त बोजा पडणार नाही. करिता खालीलप्रमाणे परिवहन सेवेतील दरवाढीस एकमताने मंजुरी देण्यात येत आहे. पुढील टप्प्याची दरवाढ करण्यापूर्वी पुन:श्च विषय सभेपूढे घेण्यात यावा, अशी सुचनाही करण्यात येत आहे. तसेच १२.०० किमी पासून पुढील टप्प्यामध्ये कोणतीही दरवाढ नाही.
<table>
<tr><th rowspan="2">टप्पा क्र.</th><th rowspan="2">अंतर</th><th colspan="2">सध्याचे प्रवासी दर</th><th colspan="2">नविन दर</th></tr>
<tr><th>प्रौढ भाडे</th><th>सवलतीचे भाडे</th><th>प्रौढ भाडे</th><th>सवलतीचे भाडे</th></tr>
<tr><td>१</td><td>०.००-२.००</td><td>८.००</td><td>४.००</td><td>७.००</td><td>४.००</td></tr>
<tr><td>२</td><td>२.००-४.००</td><td>८.००</td><td>४.००</td><td>१०.००</td><td>५.००</td></tr>
<tr><td>३</td><td>४.००-६..००</td><td>९.००</td><td>५.००</td><td>११.००</td><td>६.००</td></tr>
<tr><td>४</td><td>६.००-८.००</td><td>११.००</td><td>६.००</td><td>१३.००</td><td>७.००</td></tr>
<tr><td>५</td><td>८.००-१०.००</td><td>१३.००</td><td>७.००</td><td>१५.००</td><td>८.००</td></tr>
<tr><td>६</td><td>१०.००-१२.००</td><td>१६.००</td><td>८.००</td><td>१७.००</td><td>९.००</td></tr>
</table>
अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक - मनिष वर्तक<br>ठराव सर्वानुमते मंजुर</td>
</tr>
<tr>
<td>१३</td>
<td>वसई विरार शहर महानगरपालिका पदाधिकारी व अधिकारी याचे वाहन प्रतिपूर्ती भत्यांच्या अनुज्ञेय यादीत नवीन</td>
<td><u>प्रस्ताव / निर्णय</u> :- वरील प्रस्तावाचे वाचन केले असता खालीलप्रमाणे पदाधिकारी व अधिकारी ह्यांचे वाहन प्रतीपुर्ती भत्त्याच्या अनुज्ञेय यादीत नवीन अधिकारी वर्गाचा समावेश करणेस व खालीलप्रमाणे वाहन प्रतिपुर्ती भत्ता देणेस व वेळोवेळी आकृती बंधातील मंजूर विभागप्रमुख / अधिकारी वर्गाची पदे ज्यावेळी भरण्यात येतील त्यावेळी मा. आयुक्त यांच्या मंजूरीने त्यांना वाहन प्रतिपुर्ती भत्ता देणेस</td>
</tr>
</table>

अधिकारी वर्गाचा समावेश करणे व नवीन दरास मंजूरी देणेबाबत.

मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाधिकारी व अधिकारी | जुनेदर | प्रशासनाने प्रस्तावित केलेले दर | महासभेने मंजूर केलेले दर (प्रती माह) |
|---|---|---|---|---|
| १ | मा. महापौर | रु. ४५,०००/- | रु. ७५,०००/- | रु. ७५,०००/- |
| २ | मा. आयुक्त | रु. ४००००/- | रु. ७५,०००/- | रु. ७५,०००/- |
| ३ | मा. उप महापौर | रु. ४०,०००/- | रु. ६५,०००/- | रु. ६५,०००/- |
| ४ | मा. सभापती स्थायी समिती | रु. ४०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ५५,०००/- |
| ५ | मा. विरोधी पक्ष नेता | रु. ३७,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ५०,०००/- |
| ६ | मा. सभागृह नेता | रु. ३७,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ५०,०००/- |
| ७ | मा. सर्व सभापती, (परिवहन सभापती, महिला बालकल्याण समिती सभापती व इतर सभापती) | रु. ३५,०००/- | रु. ४०,०००/- | रु. ४५,०००/- |
| ८ | मा. उपआयुक्त | रु. ४०,०००/- | रु. ४५,०००/- | रु. ४५,०००/- |
| ९ | मा. मुख्य लेखा परिक्षक/मुख्य लेखा अधिकारी | रु. ४०,०००/- | रु. ४०,०००/- | रु. ४०,०००/- |
| १० | मा. उपसंचालक नगररचना | रु. ४०,०००/- | रु. ३८,०००/- | रु. ४५,०००/- |
| ११ | मा. शहर अभियंता | रु. ४०,०००/- | रु. ४०,०००/- | रु. ४५,०००/- |
| १२ | मा. कार्यकारी अभियंता | --- | रु. ४०,०००/- | रु. ४५,०००/- |
| १३ | मा. नगर अभियंता | --- | रु. ३८,०००/- | रु. ४५,०००/- |
| १४ | करमुल्य निर्धारक | रु. ४०,०००/- | रु. ३८,०००/- | रु. ४०,०००/- |
| १५ | उप अभियंता/सहा.आयुक्त/प्र.सहा.आयुक्त/ नगरसचिव/वैद्यकिय आरोग्य अधिकारी व विभाग प्रमुख/ सर्व प्रभारी | रु. ३५,०००/- | रु. ३५,०००/- | रु. ४०,०००/- |
| १६ | शाखा अभियंता | --- | --- | रु. ४०,०००/- |

वरील प्रमाणे मा. महासभा वाहन प्रतिपूर्ती भत्ता मंजूर करीत आहे.

अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)        सुचक - पंकज ठाकूर

ठराव सर्वांनुमते मंजुर

**१४** | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) | **प्रस्तावाचा निर्णय :-** वरील प्रस्तावात अवगत केल्यानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) या महत्वाकांक्षी योजनेची

| | | |
|---|---|---|
| | अंमलबजावणी आढावा. | महापालिकेच्या कार्यक्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने केलेल्याउपाययोजना व प्रस्तावीत उपाययोजनांना ही सभा मान्यता प्रदान करीत आहे.<br>अनुमोदक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे) सुचक - रुपाली पाटील<br>ठराव सर्वानुमते मंजुर |